# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**नवजात बालकांना गोवरचे इंजेक्शन देण्यासाठी २३ क्रमाकाची सिरीज वापरली जात असल्याबाबत**

**(१) १६६०४ (१४-०८-२०१५). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवजात बालकास ९ व्या महिन्यात आणि १५ व्या महिन्यात गोवरचे इंजेक्शन देण्यात येते यासाठी नियमाने २६ क्रमांकाची सिरींज वापरणे गरजेचे असताना नाशिक जिल्हयातील शासकीय रुग्णालये व महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये सरसकट २३ क्रमांकाची सिरींज वापरली जात असल्याने स्वस्तात मिळणाऱ्या सिरींजमुळे बालकाच्या आरोग्याशी खेळण्याचे काम शासनाच्या आरोग्य विभागाकडून होत आहे त्यामुळे संबंधित विभागाची चौकशी करुन त्यांच्यावर गुन्हे दाखल करावे अशी मागणी जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे आयोजित करण्यात आलेल्या जिल्हा ग्राहक संरक्षण समितीच्या बैठकीत अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक यांच्याकडे दिनांक १७ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास तक्रार करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, चौकशी अहवालानसुार संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०९-२०१८) :** (१) होय खरे आहे.

नाशिक जिल्हयामध्ये नियमित लसीकरण कार्यक्रमांतर्गत गोवर लसीकरण करण्याकरीता केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे ०.५ मिली सिंरीजेसला जोडलेल्या २३ नं. च्या सुईचा

(Auto disable) वापर केला जातो. त्यामुळे कुठल्याही बालकांच्या आरोग्यास धोका उद्‌भवत नाही. सदर सिरींजेसचा पुरवठा केंद्र शासनाकडून नियमित लसीकरण कार्यक्रमांतर्गत केला जातो.

(२) चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आंबा (ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर) येथील आरोग्य केंद्राची झालेली दुरावस्था**

**(२) २९०४१ (२१-०१-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबा (ता.शाहुवाडी जि.कोल्हापूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात माहे जुलै, २०१५ पासून आरोग्यसेविका नसल्याने सदर केंद्रात दुरावस्था असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आरोग्य केंद्रात सलाईनच्या खोक्यात दारूच्या बाटल्या तसेच तेथे दगडाची चूल ही आढळून आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासन कोणती कारवाई करणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत (३०-०८-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्राकडील आरोग्य सेविका पद रिक्त आहे. तथापि एन.एच.एम.अंतर्गत आरोग्य सहायिका (महिला) हे पद भरलेले आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सदर प्राथमिक आरोग्य केंद्रात सलाईनच्या खोक्यात बाटल्या तसेच दगडाची चूल आढळल्याबाबत वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सहाय्यक व इतर कर्मचारी यांच्या म्हणण्यानुसार सदरच्या बाटल्या पाणी नमुने तपासणीसाठी आणल्या होत्या असे लेखी लिहून दिले. सद्यस्थितीत सदर ठिकाणी कोणतेही साहित्य आढळून आले नाही.

(३) चौकशी अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी ग्रामपंचायत आंबा येथील मा.सरपंच/उपसरपंच/ गाम्र पंचायत सदस्य व इतर पदाधिकारी यांची भेट घेवून सदर वस्तुस्थितीचा खुलासा केला आहे व तो त्यांनी मान्य केला आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रातील स्वच्छता व कर्मचारी यांची उपस्थितीबाबत ताकीद दिलेली आहे. आंबा प्राथमिक आरोग्य केंद्र व्यवस्थित सुरु आहे.

---

**जाणवळ (ता.चाकूर, जि.लातूर) येथिल प्राथमिक आरोग्य केंद्राची झालेली दुरवस्था**

**(३) ३२४६१ (२१-०१-२०१६). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जाणवळ (ता.चाकूर, जि.लातूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत ७ उपकेंद्र असून ३२ गावातील सुमारे ६० हजारांहून अधिक ग्रामीण जनतेस आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या असून सदरहू प्राथमिक आरोग्य केंद्रात ४ आरोग्य सेवकांच्या जागा रिक्त असून कायमस्वरुपी डॉक्टरांची नियुक्ती नाही, ४ खाटांचा वार्ड नाही, शवविच्छेदन कक्षाची झालेली पडझड तसेच इतर संवर्गातील पदेही रिक्त असल्याने व अपुरा व अनियमित जीवनावश्यक औषधांचा कायम तुटवडा असल्याने सदरहू आरोग्य केंद्रांतर्गत येणाऱ्या ग्रामीण जनतेस आरोग्य सेवेपासून वंचित रहावे लागत आहे व अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) सदरहू प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी व अन्य कर्मचाऱ्यांच्या अभावामुळेच व कायमस्वरुपी डॉक्टर नसल्यामुळे दररोज बाह्य रुग्ण विभागात औषधोपचांरासाठी येणाऱ्या सुमारे १२५ गरजू रुग्णांना आरोग्य सेवा मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी एकूण मंजूर असलेल्या वैद्यकिय अधिकारी व अन्य संवर्गातील आरोग्य सेवकांची कर्मचाऱ्यांची पदे न भरण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदरहू आरोग्य केंद्र सुरळीत सुरु होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?

**डॉ. दीपक सावंत (३०-०८-२०१८) :** (१), (२), (३) व (४) प्राथमिक आरोग्य केंद्र जानवळ येथील रिक्त बाबतची वस्तुस्थिती पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | संवर्ग | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | वै.अ. | २ | २ | - |
| २ | आ.सहा.(पु) | २ | २ | - |
| ३ | आ.सहा. (म) | १ | १ | - |
| ४ | आ.स.(म) | ८ | ७ | १ |
| ५ | आ.से.(पु) | ७ | ४ | ३ |
| ६ | औ.नि.अ. | १ | १ | - |
| ७ | शिपाई | ५ | ४ | १ |

सद्यस्थितीत रिक्त पदांचा कार्यभार कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्याकडे देण्यात आला असून रुग्णसेवा सुरळीतपणे देण्यात येत आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्रास मागणीनुसार औषध पुरवठा करण्यात येत आहे. सन २०१७-१८ या वर्षात शवविच्छेदनगृहास १० लाखाचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. चार खाटांचा वार्ड अद्याप बांधलेला नाही. तसेच रिक्त पद भरती प्रक्रिया ग्रामविकास विभाग व संबंधीत जिल्हा परिषद यांचेकडून करण्यात येत आहे.

---

**मौजे दहेगाव (ता.राळेगाव, जि.यवतमाळ) येथिल प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्तपदांबाबत**

**(४) ३४८१२ (२१-०१-२०१६). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे दहेगाव (ता.राळेगाव, जि.यवतमाळ) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात १६ कर्मचा-यांची पदे मंजूर आहेत. परंतु निम्यापेक्षा जास्त पदे रिक्त असल्याने ग्रामीण भागातील रूग्णांचे उपचाराअभावी गैरसोय होत असल्याचे दिनांक १८ जुलै वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राथमिक आरोग्य केंद्राला २० ते २२ खेडी जोडलेली असतांना व वैदयकीय अधिकारी दोन पदे मंजुर असतांना एकावरच आरोग्य केंद्राचा कार्यभार चालवीत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रिक्त पदे कधीपर्यंत भरण्यात येणार आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (३०-०८-२०१८) :** (१) हे खरे आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र दहेगाव येथे आकृतीबंधानुसार १५ मंजूर पदांपैकी ६ पदे भरलेली आहेत व ९ पदे रिक्त असल्याची वस्तुस्थिती पुढीलप्रमाणे :-

| अ.क्र. | सवंर्ग | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी | २ | १ | १ |
| २ | औषध निर्माण अधिकारी | १ | १ | ० |
| ३ | आरोग्य सहाय्यक (पुरुष) | २ | १ | १ |
| ४ | आरोग्य सहाय्यक (महिला) | १ | ० | १ |
| ५ | आरोग्य सेविका | १ | ० | १ |
| ६ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | १ | ० | १ |
| ७ | कनिष्ठ सहायक | १ | ० | १ |
| ८ | वाहनचालक | १ | १ | ० |
| ९ | पुरुष परिचर | ३ | २ | १ |
| १० | स्त्री परिचर | १ | ० | १ |
| ११ | सफाई कामगार | १ | ० | १ |
| | एकूण | १५ | ६ | ९ |

(२) हे खरे नाही.

मौजे दहेगाव प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी गट-अ चे १ पद भरलेले असून गट-ब चे वैद्यकीय अधिकारी यांचे पद रिक्त आहे. सदर पदावर प्रतिनियुक्तीने वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहे.

(३) गट-क व गट-ड कर्मचाऱ्यांची रिक्त पदे ग्राम विकास विभागामार्फत भरण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धामक (जि.अमरावती) येथील प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच उपकेंद्रमध्ये कर्मचाऱ्याची पदे रिक्त असल्याबाबत**

**(५) ३८८७९ (१६-०१-२०१६). श्री.रणजीत कांबळे (देवळी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धामक (जि.अमरावती) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये तसेच तेथील उपकेंद्रामध्ये कर्मचाऱ्याची अनेक पदे रिक्त असुनसुध्दा डॉक्टर देखील रजेवर गेले आहेत अशा परिस्थितीत रुग्णालयात आलेल्या रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्राथमिक आरोग्य केंद तसेच उपकेंद्र मधील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (३०-०८-२०१८) :** (१) हे खरे नाही.
प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकाऱ्यांची २ पदे मंजूर असून माहे जून २०१५ मध्ये १ पद रिक्त होते. ते पद २० नोव्हेंबर २०१५ रोजी भरण्यात आले. तथापि सद्यस्थितीत सर्वसाधारण बदल्यामध्ये जून २०१८ मध्ये एक वैद्यकीय अधिकाऱ्याची बदली झाल्यामुळे एक पद रिक्त झाले आहे व ते भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(२) धामक प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रातील आकृतीबंधानुसार आरोग्य सेवक महिला व पुरुष यांची मंजूर पदे भरलेली आहेत. तसेच वैद्यकीय अधिकाऱ्याचे रिक्त पद भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे वहाळ (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या विविध समस्यांबाबत**

**(६) ३९९१७ (१०-०५-२०१६). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे वहाळ (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात अपुरा कर्मचारी वर्ग, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, एक्स रे यासह अन्य सुविधांचा अभाव यामुळे रुग्णांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर केंद्रांतर्गत येणारी ५ आरोग्य उपकेंद्रे भाड्याच्या इमारतीत कार्यरत असून तेथे सोयी-सुविधांचा अभाव आहे, हे खरे आहे काय

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (३०-०८-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) उपकेंद्रे भाडयाच्या इमारतीत कार्यरत आहेत हे खरे आहे. परंतु त्या ठिकाणी सोयी-सुविधांचा अभाव आहे, हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हा परिषद आणि आरोग्य विभागाचा लोगो वापरुन करण्यात आलेल्या एका कॅलेंडरची प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्राना जबरदस्तीने विक्री सुरु असल्याबाबत**

**(७) ४३३१० (१०-०५-२०१६). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हा परिषद आणि आरोग्य विभागाचा लोगो वापरुन करण्यात आलेल्या एका कॅलेंडरची प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्राना जबरदस्तीने विक्री सुरु असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सन २०१५ चे कॅलेंडर २०१६ मध्ये विकले जात असून त्यातही २० रुपये किंमतीच्या कॅलेंडरची विक्री किंमत ९५० रुपये लावण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोल्हापूर जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्या लोगोखाली झालेल्या गैरव्यवहाराची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) तद्नुसार यासंदर्भातील दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२८-०८-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

एका खाजगी प्रिंटरकडून आरोग्य विभागाचा लोगो छापून कॅलेंडर तयार करण्यात आले होते.

(२) अंशत: खरे आहे.

खाजगी प्रिंटरचे कॅलेंडर असल्याने त्याच्या किंमतीबाबत निश्चितपणे सांगता येणार नाही.

(३) व (४) सदर प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आलेली असून वैद्यकीय अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी व कर्मचारी यांचे खुलासे पाहता कोणीही शासकीय रुग्णालयासाठी कॅलेंडर खरेदी केलेले नाही अथवा त्याची रक्कम अदा केलेली नाही.

---

**चांदवड तालुक्यात (जि.नाशिक) उपजिल्हा रुग्णालयाच्या आवारातील ट्रामा केअर सेंटर बंद असल्याबाबत**

**(८) ४९९१७ (११-०५-२०१६). डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदवड तालुक्यात (जि.नाशिक) उपजिल्हा रुग्णालयाच्या आवारातील ट्रामा केअर सेंटरचे उद्‌घाटन पालकमंत्री यांच्या हस्ते झाल्यानंतरही कर्मचा-यांच्या रिक्त पदांमुळे हे ट्रामा केअर अद्यापही बंद अवस्थेत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच पदे भरली नसल्याने अतिगंभीर रुग्ण हे इतरत्र संदर्भीयत करण्याची वेळ येथील अधिका-यांवर येत असून या ट्रामा केअर सेंटरमध्ये सी-आर्म मशीन तसेच हायड्रोलिक टेबलची गरज असून ते उपलब्ध झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू ट्रामा केअर सेंटरमध्ये तातडीने रिक्त पदे भरुन रुग्णांची गैरसोय दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (३०-०८-२०१८) :** (१) हे खरे नाही.

ट्रामा केअर युनिट, उपजिल्हा रुग्णालय चांदवड, जि.नाशिक येथे एकूण ९ मंजूर पदे असून त्यापैकी ७ पदे भरली आहेत व २ पदे रिक्त आहेत. वैद्यकीय अधिकारी गट-अ चे १ पद व गट - क चे परिसेविका संवर्गाचे १ पद रिक्त आहे. सद्यस्थितीत ट्रामा केअर सेंटरचे कामकाज सुरु असून उपलब्ध वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांचेकडून रुग्णांवर उपचार करण्यात येत आहे.

(२) अंशत: खरे आहे.

उपजिल्हा रुग्णालयातील कार्यरत वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने रुग्णांवर उपचार केले जात आहेत. ट्रामा केअर युनिटसाठी सी-आर्म मशीन प्राप्त झाली आहे. तसेच हायड्रोलीक टेबल प्राप्त करुन घेण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) गट अ ची पदे भरण्याबाबत शासन स्तरावरुन कार्यवाही सुरु आहे. सद्यस्थितीत ट्रामा केअर सेंटरचे कामकाज सुरु असून उपलब्ध वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांचेकडून रुग्णांवर उपचार केले जातात. रुग्णांची गैरसोय होत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सांगोले ग्रामीण (जि.सोलापूर) येथिल रुग्णालयामधील ट्रामा केअर युनिट इमारतीच्या बांधकामाबाबत**

**(९) ५४९९३ (३०-०८-२०१६). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरज ते पंढरपूर या नॅशनल हायवे क्र. १६६ वरील सुमारे १३५ किमी अंतरावर वाहनाचे दररोज अपघात होत असल्याने व या अंतरामध्ये अपघाती व्यक्तीवर उपाययोजना करण्यासाठी काहीही आरोग्य सुविधा उपलब्ध नाहीत, हे खरे आहे काय
(२) तसेच, सांगोले येथील ग्रामीण रुग्णालयामध्ये ट्रामा केअर युनिट इमारत बांधण्यासाठी रु. ४.३५ कोटी किमतीच्या बांधकामासाठी प्रशासकीय मान्यता दिनांक १२ जून, २०१५ रोजी देण्यात आली, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, या इमारतीच्या बांधकामाच्या निविदा काढून बांधकामास केव्हा सुरुवात करण्यात येणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत (०४-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.

सदर रस्त्यावर अपघात झाल्यास अपघाती रुग्णांवर सांगोला ग्रामीण रुग्णालयात तातडीने उपचार करण्यात येतात. अपघातामध्ये गंभीर जखमी असलेल्या रुग्णांना जिल्हा रुग्णालयाकडे पुढील उपचारार्थ पाठविण्यात येते.
(२) व (३) हे खरे आहे.

ग्रामीण रुग्णालय, सांगोला येथील ट्रामा केअर युनिट इमारत बांधकामास सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये १.०० कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला असून सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यानंतर इमारतीचे बांधकाम करण्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

### राज्यात पुरुषांमध्ये नसबंदीबाबत जनजागृती आणि समुपदेशन करण्याबाबत

**(१०) ६५२८८ (२७-०१-२०१७). अ‍ॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), अ‍ॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील वाढणारी लोकसंख्या नियंत्रणात आणण्यासाठी देश आणि राष्ट्रीय पातळीवर कुटुंबनियोजनाच्या कार्यक्रमातील नसबंदी शस्त्रक्रियेत महिलांचा पुढाकार असून मुंबईतील महिलांचे नसबंदीचे प्रमाण ४३.५ टक्के असून पुरुष नसबंदीचे प्रमाण शुन्यं टक्के आहे तर राज्यातील महिला नसबंदीचे प्रमाण ४४.८ टक्के असून तर पुरुष नसबंदीचे प्रमाण फक्त ०.२ टक्के असल्याचे वास्तव राष्ट्रीय कौटुंबिक आरोग्य सर्वेक्षणाच्या सन २०१५-१६ च्या अहवालात दिनांक १ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, पुरुषांमध्ये नसबंदीबाबत जनजागृती आणि समुपदेशन करण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) पुरुषांमध्ये नसबंदीबाबत जनजागृती आणि समुपदेशन करण्यासाठी पुढील कार्यवाही करण्यात आली आहे.

• केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये दिनांक २१ नोव्हेंबर २०१६ ते ४ डिसेंबर, २०१६ या कालावधील पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया पंधरवडा मोहिम स्वरुपात राबविण्यात आला.

• या मोहिमेंतर्गत २१ नोव्हेंबर ते २७ नोव्हेंबर, २०१६ या पहिल्या टप्प्यामध्ये आरोग्य कर्मचाऱ्यांनी गृहभेटीद्वारे लाभार्थ्यांना नो स्कालपेल व्हॅसेक्टॉमी या आधुनिक पुरुष नसबंदी शस्त्रक्रियेबाबत माहिती दिली.

• पुरुष नसबंदीबाबत जनजागृती करण्यासाठी टिव्ही स्पॉटस दुरदर्शन वाहिनीवरुन व आकाशवाहीनीवरुन रेडिओ जिंगल्स प्रसारित करण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महानगरात मानवी अवयव प्रत्यारोपण संदर्भात अवयवदाता आणि अवयवप्रत्यारोपण समितीच्या निकषानुसार उच्चस्तरीय समितीचे गठन करण्याबाबत**

**(११) ६५६७४ (२७-०१-२०१७). श्री.अबू आजमी (मानखुर्द शिवाजीनगर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषतः महामुंबई व आसपासच्या विकसित व विकसनशील महानगरात मानवी अवयव प्रत्यारोपणबाबतच्या संदर्भात अवयवदाता आणि अवयवप्रत्यारोपण समितीच्या निकषानुसार उच्चस्तरीय समितीचे गठन करण्याबाबतची मागणी १६ सदस्यीय समितीकडे हस्तांतरित करण्याची मागणी राज्यातील समाजसेवी संस्थानद्वारा तसेच सेवाभावी संस्था व नागरिकांनी, जनप्रतिनिधी व अवयवप्रत्यारोपण संघाकडून तसेच आसपासच्या क्षेत्रातील रहिवाशी संघटना यांच्यावतीने मा. मंत्री (सार्वजनिक आरोग्य व वैद्यकीय शिक्षण), मा. राज्यमंत्री (सार्वजनिक आरोग्य व वैद्यकीय शिक्षण), अतिरिक्त मुख्यसचिव (सार्वजनिक आरोग्य व वैद्यकीय शिक्षण), विभागीय आरोग्य संचालक तसेच संबंधित जिल्हाधिकारी आणि संबंधित महानगरपालिका आयुक्त व इतर तत्सम अधिकाऱ्यांकडे दिनांक २३ ऑगस्ट २०१६ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, संबंधित प्रकरणी सार्वजनिक आरोग्य व वैद्यकीय शिक्षण विभागाच्यावतीने तसेच जनप्रतिनिधी व जागृत नागरिकांच्या संघटनेने सदर बाब वेळोवेळी निदर्शनास आणली आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदर बाबतीत सखोल चौकशीअंती काय निष्पन्न झाले व त्याबाबत कोणती कार्यवाही वा अनुकूल निर्णय घेण्यात आला वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (३०-०८-२०१८) :** (१) निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. तथापि, मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा, १९९४ व मानवी अवयव प्रत्यारोपण (सुधारणा) कायदा, २०११ आणि मानवी अवयव प्रत्यारोपण नियमावली, २०१४ नुसार प्रत्येक राज्यात सदर कायदा प्रभावीपणे राबविण्यासाठी समुचित प्राधिकाऱ्यास आवश्यक सहाय्य व सल्ला देण्यासाठी राज्य सल्लागार समितीची स्थापना दिनांक १६ डिसेंबर, २०१७ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक जिल्हा रुग्णालयात नियमित आहारतज्ञाअभावी रुग्णांना असमतोल आहार मिळत असल्याबाबत**

**(१२) ६७७७६ (२७-०१-२०१७). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा रुगणालयात गेल्या काही महिन्यापासून नियमित आहारतज्ञा अभावी रुग्णांना असमतोल आहार मिळत असल्याने रुग्णांचे आरोग्य धोक्यात आल्याचे दिनांक १० ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील रुग्णांना दिला जाणारा आहार हा राष्ट्रीय आरोग्य अभियानातील (एनआरसी) कंत्राटी आहारतज्ज्ञांकडून तपासणी केला जात असल्याची माहिती निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास राज्यातील सर्वात मोठ्या रुग्णालयातील नियमित आहारतज्ज्ञांची नियुक्ती करण्यास विभागाकडून दिरंगाई केला जात असून याबाबत शासनस्तरावरुन चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, नियमित आहारतज्ज्ञांची नियुक्ती करण्याकडे टाळाटाळ करणाऱ्या दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (३०-०८-२०१८) :** (१) जिल्हा रुग्णालय, नाशिक येथे आहारतज्ञांचे पद दिनांक ५/७/२०१७ रोजी बदलीने भरण्यात आलेले आहे.
(२) हे खरे नाही.
सद्या नियमित आहरतज्ञ हजर झालेले असल्याने रुग्णांना दिला जाणारा आहार त्यांच्याकडून तपासणी होत आहे
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सार्वजनिक आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांच्या भरती प्रक्रियेबाबत**

**(१३) ६९१५३ (१०-०१-२०१७). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक आरोग्य विभागात कर्मचाऱ्यांच्या भरतीची प्रक्रिया राबविण्यासाठी पोलिसात गुन्हा दाखल असलेल्या एका कंपनीला कंत्राट देण्यात येऊ नये अशा स्वरुपाची मागणी लोकप्रतिनिधीनी दिनांक १३ जुलै, २०१६ रोजी वा त्या सुमारास प्रधान सचिवांकडे लेखी स्वरुपात केल्याची बाब दिनांक १ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रधान सचिवांना लिहिलेल्या लेखी पत्रामध्ये लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागण्या कोणत्या आहेत,

(३) असल्यास, सार्वजनिक आरोग्य विभागात कर्मचाऱ्यांची भरती प्रक्रिया पार पाडण्याकरिता दिनांक २१ व २८ ऑगस्ट, असे दोन दिवस लेखी परिक्षा प्रिक्रिया पार पाडण्याकरिता शासनाने मागविलेल्या निविदांमध्ये किती व कोणकोणत्या कंपन्यांना सहभाग घेतला होता त्यापैकी कोणत्या संस्था व कंपनीला हे काम देण्याचा निर्णय घेण्यात आला,

(४) असल्यास, भरती प्रक्रिये संदर्भात गुन्हा दाखल केलेल्या कंपनीला काम देण्यात आले होते काय, असल्यास, त्या कंपनीविरोधात सन २००८ मध्ये गैरव्यवहार केल्याबद्दल पुणे येथील पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला होता याची माहिती सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांना असूनही अशा दोषी कंपनीला कर्मचारी भरती प्रक्रिया पार पाडण्याचे काम देण्याचा निर्णय घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (३०-०८-२०१८) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) लोकप्रतिनिधीनी कुणाल आयटी या कंपनीवर गुन्हा दाखल असल्यामुळे कंपनीची चौकशी करुन दिलेले काम रद्द करुन सेकंड लोवेस्ट आयटी कंपनी कडून काम करावे किंवा पुन्हा निविदा बोलविण्यात यावी, अशा आशयाच्या मागण्या केलेल्या आहेत.

(३) व (४) शासनाने मागविलेल्या निविदांमध्ये

१. मे.कुणाल आयटी सर्विसेस प्रा.लि.पुणे,
२. मे इ.टी.एच लिमिटेड, पुणे,
३. मे.ओएमआर टेक सोल्युशन्स, पुणे,
४. मे.एक्झॉन ऑटोमेशन प्रा.लि., मुंबई.
५. मे. ओएमआर इडिया ऑऊट सोर्सेस प्रा.लि., नवी दिल्ली.,
६. मे.देवहर्ष इन्फिोटेक प्रा.लि., मुंबई,

या कंपन्यांनी सहभाग घेतला होता. केंद्रीय खरेदी समिती बैठक दि. १५/७/२०१६ मधील निर्णयानुसार मे.कुणाल आयटी सर्विसेस, पुणे यांची निविदा अपात्र ठरवून संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे अधिनस्त सी.ई.टी. कक्षामार्फत परीक्षाविषयक कामे देण्यात आली.

___

**सावळदबारा (ता.सोयगाव, जि.औरंगाबाद) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची झालेली दुरावस्था**

**(१४) ७१०१६ (२७-०१-२०१७). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावळदबारा (ता.सोयगाव,जि.औरंगाबाद) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून पावसाळ्यात ठिकठिकाणी पाणी गळत असून या रुग्णालयात रुग्णांना सुविधा मिळत नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास सदर प्राथमिक आरोग्य केंद्राची दुरुस्ती करुन रुग्णांना आवश्यक सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२८-०८-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र सावळदबाराची इमारत जीर्ण झाली आहे. तथापि, याठिकाणी रुग्णांना आवश्यक आरोग्य सुविधा देण्यात येत आहेत.

(२) जिल्हा परिषदेच्या दि.१५.१२.२०१७ च्या सर्वसाधारण सभेमध्ये सदर जीर्ण इमारत पाडून त्याजागी नवीन इमारत बांधण्याचा ठराव मंजूर झाला आहे. त्यानुसार सन २०१८-१९ मध्ये सावळदबारा येथे नवीन इमारत बांधकामासाठी रु.६००.०० लक्षची मागणी जिल्हा नियोजन समितीकडे करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**संजय गांधी राष्ट्रीय उद्यान मुंबई येथील वन क्षेत्राची मोजणी करुन अतिक्रमकांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(१५) ८५१४४ (१६-०८-२०१७). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या सर्व्हे क्र. २३९/१ या वन क्षेत्राची मोजणी करुन अतिक्रमकांचे पुनर्वसन करण्यासंदर्भात लोकप्रतिनिधींनी, मा.मुख्यमंत्री यांना दिनांक १९ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या पत्रानुसार सचिव, वन विभाग यांनी, दिनांक १० मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तरामध्ये सदरहू जमीनीची पुर्नमोजणी करण्याबाबत, मा.सर्वोच्च न्यायालयाचे, तसेच शासनाचे आदेश नसल्याची चुकीची माहिती देऊन, लोकप्रतिनिधींची दिशाभूल केल्याचा प्रकार नुकताच निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.वने मंत्री यांच्या कार्यालयात, दिनांक ३ फेब्रुवारी २०१६ रोजीच्या, बैठकीत, मा.सर्वोच्च न्यायालयाचे सिव्हिल अपील क्र. २३५२/२००४ व इतर मध्ये दिनांक ८ मे, २००९ रोजी, पारीत केलेल्या आदेशानुसार, जमीनीची पुर्नमोजणी करावी, तसेच अतिक्रमकांचे पुनर्वसन, मौजे मालाड सर्व्हे क्र. २३९/१ च्या क्षेत्रात करण्याची मागणी लोकप्रतिनिधीनी मुख्य वन संरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान यांच्यामार्फत दिनांक १२ फेब्रुवारी, २०१६ रोजी, शासनास सादर झालेल्या अहवालावरुन सदर बाब स्पष्ट झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणाची, शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, सदर जमीनीची मोजणी करुन, तेथील अतिक्रमकांचे पुनर्वसन करण्यासंदर्भात, अद्याप शासनातर्फे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०३-०८-२०१८) :** (१) हे खरे नाही.
दनिांक १०.०२.२०१७ च्या शासन पत्रान्वये संबंधित लोकप्रतिनिधीना वस्तुस्थिवर आधारित उत्तर देण्यात आले आहे.
(२) हे खरे नाही.
मौजे मालाड सर्व्हे क्र. २३९/१ च्या क्षेत्राची पुनर्मोजणी संदर्भात वैधानिक प्राधिकरणाने (Statutory Authority) निर्णय घेणे आवश्यक आहे असे मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपील क्र. २३५२/२००५ व इतर मध्ये दिनांक ८ मे, २००९ रोजी आदेश पारीत केले आहेत. शासन पत्र दिनांक २१.१०.२०१६ अन्वये सदर क्षेत्राची पुनर्मोजणी करण्याची आवश्यकता नाही असे मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांना कळविण्यात आले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगोले (जि.सोलापूर) ग्रामीण व प्राथमिक रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत.**

**(१६) ८६१९७ (१९-०८-२०१७). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगोले (जि.सोलापूर) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयात १० पदे रिक्त असून तसेच प्राथमिक आरोग्य रुग्णालयातील एकूण ३८ पदे अनेक वर्षापासून रिक्त असल्याने ती तातडीने भरण्यात यावीत म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १६ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे मा. आरोग्य मंत्री यांचेकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू रिक्त पदे किती दिवसात शासनाकडून भरण्यात येणार आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (३०-०८-२०१८) :** (१) हे खरे आहे.

ग्रामीण रुग्णालय, सांगोला, सोलापूर येथे वैद्यकीय अधिकारी (वर्ग-२) एकूण ३ मंजूर पदांपैकी २ पदे भरलेली असून १ पदे रिक्त आहे. गट क च्या एकूण १५ पदांपैकी मंजूर १३ पदे भरलेली असून २ पदे रिक्त आहेत व गट ड च्या एकूण ७ मंजूर पदांपैकी ३ पदे भरलेली असून ४ पदे रिक्त आहेत.

(२) ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही शासन स्तरावरुन सुरु आहे. तसेच गट क व गट ड ची रिक्त पदे भरण्याबाबत लेखी परिक्षा जानेवारी २०१७ मध्ये घेण्यात आल्या होत्या. सदर परिक्षांचा निकाल जाहिर करण्यात आला असून निवड झालेल्या उमेदवारांना पदस्थापना देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच सांगोले तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या १२ मंजूर पदांपैकी रिक्त असलेली ६ पदे सार्वजनिक आरोग्य विभागाकडून भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच उर्वरित रिक्त पदे भरण्याची कार्यवाही जिल्हा परिषद स्तरावरुन सुरु आहे.

(३) रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

---

## टाकळी कडेवळी (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात लहान मुलांना देण्यात येणाऱ्या लसीचा तुटवडा निर्माण झाल्याबाबत

**(१७) ८७७०५ (१२-०८-२०१७). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टाकळी कडेवळी (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात लहान मुलांना देण्यात येणाऱ्या लसीचा तुटवडा असल्याचे दिनांक १२ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार कडेवळी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात लहान मुलांना देण्यात येणाऱ्या लसीचा पुरेशा प्रमाणात पुरवठा करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०९-२०१८) :** (१) अंशत : खरे आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र, टाकळी कडेवळी येथे एप्रिल महिन्याच्या (सन २०१७) दुस-या मंगळवारी नियमित लसीकरण झाले असून लसीकरणापासून कोणीही लाभार्थी वंचित राहिलेले नाही. सदर लसीकरणादरम्यान केवळ आय.पी.व्ही. ही लस उपलब्ध नव्हती. तथापि, पुढील लसीकरण सत्रात सदर लस लाभार्थ्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

(२) व (३) उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक मंडळ, नाशिक यांच्यामार्फत प्राथमिक आरोग्य केंद्र, टाकळी कडेवळी येथे दरमहा लस वितरित करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात पिसीपीएनडीटी कायद्या अंतर्गत दाखल प्रकरणे मोठ्या प्रमाणावर प्रलंबित असल्याबाबत**

**(१८) ९२०४१ (१९-०८-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुलींना गर्भात मारून टाकणाऱ्याना कठोर शिक्षा व्हावी, त्याद्वारे समाजातील अपप्रवृत्तीवरही अंकुश लागावा, यासाठी पिसीपीएनडीटी कायद्यांतर्गतची प्रकरणे सहा महिन्यांत निकाली लावण्याचे स्पष्ट निर्देश मा.सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत, हे खरे आहे काय

(२) असल्यास, राज्यात सदरहू कायद्या अंतर्गत सन २००२ ते माहे मे, २०१७ पर्यंत उच्च न्यायालयात २७८ पैकी ९९ (३७ टक्के), जिल्हा सत्र न्यायालयात १८५ पैकी १०२ (५५ टक्के), प्रथम न्यायदंडाधिकारी न्यायालयात ५५९ पैकी ३०४ (५४ टक्के) प्रकरणे न्यायासाठी प्रलंबित आहेत, हे हि खरे आहे काय;

(३) असल्यास, राज्यातील विविध न्यायालयांत सदरहू कायद्या अंतर्गत मोठ्या प्रमाणावर प्रलंबित असलेल्या प्रकरणाचा जलदगतीने निकाल लावण्यासाठी शासनाकडून आजतागायत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

राज्यात सन २००२ ते २०१७ पर्यंत मा.उच्च न्यायालयात ३३%, मा. जिल्हा व सत्र न्यायालयात ४७ % आणि प्रथम न्यायदंडाधिकारी न्यायालयात ४७% प्रकरणे न्यायासाठी प्रलंबित आहेत.

(३) प्रकरणे जलदगतीने निकाली काढण्यासाठी मा.आयुक्त, आरोग्य सेवा, मुंबई यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई तसेच नागपूर व औरंगाबाद खंडपीठांचे निबंधक यांना दि.२७/०४/२०१७ च्या पत्रान्वये विनंती केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कापडसिंगी, (ता. हिंगोली) प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णांची होत असलेली गैरसोय**

**(१९) ९२३०४ (१९-०८-२०१७). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कापडसिंगी, (ता. हिंगोली) प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णांना कोणत्याच सुविधा मिळत नसून केंद्रात २० पैकी ११ जागा रिक्त असून दोन वैद्यकीय अधिका-यांचा समावेश असण्याचे माहे मे २०१७ व त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या केंद्रात कार्यरत असलेल्या पैंकी अर्धे कर्मचारी गैरहजर असल्याने रुग्णांची गैरसोय होत असून याकडे प्रशासनाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२८-०८-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र कापडसिंगी, ता.सेनगांव, जि.हिंगोली येथील एकुण मंजूर १५ पदांपैकी ०२ वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या पदासह ०८ पदे रिक्त आहेत. सद्यस्थितीत प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णांना आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने नजीकचे प्राथमिक आरोग्य केंद्र साखरा, ता.सेनगांव जि.हिंगोली येथील वैद्यकीय अधिकारी यांना अतिरिक्त पदभार सोपविण्यात आला असून त्यांच्यामार्फत रुग्णांना आरोग्य सेवा पुरविण्यात येत आहेत.
(२) हे खरे नाही.

प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांपैकी सर्व कर्मचारी कामावर हजर आहेत. त्यांच्यामार्फत रुग्णांना सेवा दिली जात आहे.
(३) वैद्यकिय अधिकाऱ्यांची पदे भरण्याबाबतची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे. तसेच गट-क ची पदे भरण्याबाबत ग्राम विकास विभागामार्फत राज्यस्तरावरुन भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### बीड जिल्हयात गर्भपात करुन देणारे टोळी सक्रीय असल्याबाबत

**(२०) ९४३३८ (२१-०८-२०१७). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्हयात गर्भपात करुन देणारी टोळी सक्रीय झाली असून त्याचे कर्नाटक पर्यंत संबध असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.

हेल्पलाईन, टोल फ्री नंबरवर अथवा प्रत्यक्ष तक्रार राज्य अथवा जिल्हास्तरावर प्राप्त झालेली नाही
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**धुळे जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रात काम करणा-या अंशकालीन महिला परिचरांचे वेतन प्रलंबित असल्याबाबत**

**(२१) ९५१२१ (०६-०१-२०१८). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रात काम करणाऱ्या अंशकालीन महिला परिचरांचे वेतन ७ महिन्यापासून देण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील अंशकालीन महिला परिचरांना दरमहा ६ हजार रुपये देण्याचा निर्णय झाला असून मा. मुख्यमंत्री यांनी त्यास मंजूरी देऊनही अद्याप त्यावर कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन सदर महिला परिचरांचे थकीत वेतन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (३०-०८-२०१८) :** (१) हे खरे नाही.

धुळे जिल्हयातील प्राथमिक आरोग्य उपकेंद्रात एकूण २३२ अंशकालीन महिला परिचर (अर्धवेळ स्त्री परिचर) यांचे मंजूर पदांपैकी २२५ पदे कार्यरत आहेत. त्यांना माहे फेब्रुवारी पेड इन मार्च २०१८ पर्यंत मानधन देण्यात आले आहे.

(२) वित्त विभागाने एखाद्या संवर्गाच्या वेतनसंरचनेतील त्रुटीसंबंधीचे कोणतेही प्रस्ताव/संदर्भ सद्य:स्थिती विचारात न घेण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच असे प्रस्ताव विहीत कार्यपध्दतीनुसार राज्य वेतन सुधारणा समिती -२०१७ च्या विचारार्थ सादर करण्याबाबत कळविले आहे,

(३) जिल्हा स्तरावर मे २०१८ अखेर पर्यंत मानधनासाठी निधी प्राप्त झाला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सावंतवाडी (जि.सिंधुदूर्ग) उपजिल्हा रुग्णालयात औषधांचा तुटवडा असल्याबाबत**

**(२२) ९५९४९ (२७-१२-२०१७). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावंतवाडी उपजिल्हा रुग्णालयात (जि.सिंधुदूर्ग) औषधांचा तुटवडा असून रुग्णांलयात औषधोपचार व उपचार सुविधा मिळावी यासाठी स्थानिक ग्रामस्थांनी दिनांक १३ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास उपोषण केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णांना चांगली सेवा देण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०९-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

दिनांक १२.०९.२०१७ रोजी त्यांनी उपोषण केले होते.

(२) सदर रुग्णालयात अत्यावश्यक व तातडिच्या औषधांचा साठा उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. मनुष्यबळ व साहित्यसामग्रीच्या आधारे रुग्णांना नियमित आरोग्य सेवा पुरविण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर शहरातील गोरेवाडा जंगलातील प्रतिबंधीत क्षेत्रात अनैतीक घटना घडत असल्याबाबत**

**(२३) ९६२३१ (२६-१२-२०१७). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील गोरेवाडा जंगलाच्या प्रतिबंधीत क्षेत्रात अनैतीक घटना घडत असल्याबाबतची बाब माहे ऑगस्ट २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, गोरेवाडा जंगल परीसरातील तलावाच्या प्रतिबंधीत क्षेत्राला भेदुन महाविद्यालयीन व शालेय विद्याथ्यांचे पोहणे, दारू पिणे, जोराने बाईक रायडींग करणे, प्रेमीयुगलांचे फिरणे अशा अनैतीक घटनांवर कडक निर्बंध असतांना देखील जंगलाच्या परीसरात घडत असल्याचे स्टिंग ऑपरेशनमुळे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, गोरेवाडा जंगल परीसरात तैनात असलेले सुरक्षारक्षक व वनविभागाच्या अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे अनैतीक घटना घडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, गोरेवाडा जंगल परीसरातील प्रतिबंधीत क्षेत्रात प्रवेश नसतांनाही प्रवेश करण्यास विरोध न करणाऱ्या सुरक्षारक्षक व वन विभागाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०३-०८-२०१८) :** (१), (२) व (३) नागपूर शहरातील गोरेवाडा जंगलाच्या प्रतिबंधित क्षेत्रात अनैतिक घटना घडल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे येथील येरवडा प्रादेशिक मनोरुग्णालयात मनुष्यबळाची कमतरता असल्याने रुग्णांना वैद्यकीय सेवा सुविधांपासून वंचित रहावे लागत असल्याबाबत.**

**(२४) ९६३९१ (२७-१२-२०१७). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील येरवडा प्रादेशिक मनोरुग्णालयात गेल्या दोन वर्षापासून मनुष्यबळाची कमतरता असल्याने बहुतांश रुग्णांना वैद्यकीय सेवा सुविधांपासून वंचित रहावे लागत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात रुग्णालय प्रशासनाने जादा मनुष्यबळाची तात्काळ भरती केली जावा असा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदर प्रस्तावावर निर्णय घेऊन या रुग्णालयाला आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (३०-०८-२०१८) :** (१) नाही.

(२) नाही.

तथापि पुणे प्रादेशिक मनोरुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत शासन स्तरावर प्रयत्न सुरु आहेत.

(३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून मनोविकारतज्ञ २० पदे भरण्याची जाहिरात देण्यात आली आहे. राज्यातील वैद्यकीय अधिकारी गट-अ, संवर्गाच्या ३९४ रिक्त पदांची जाहिरात दिनांक ८/९/२०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार दिनांक ४ व ५ डिसेंबर २०१७ रोजी समुपदेशनाद्वारे उमेदवारांची निवड करुन एका वैद्यकीय अधिकाऱ्यांस प्रादेशिक मनोरुग्णालय, पुणे येथे नियुक्ती देण्यात आली आहे. मनोरुग्णालयातील पुरुष व स्त्री परिचरांची ४२ पदे माहे मे २०१७ मध्ये पदोन्नतीने भरण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुरगुड (ता. कागल, जि.कोल्हापूर) येथील ग्रामीण रुग्णालयाचा विस्तार करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(२५) ९६४१० (२७-१२-२०१७). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरगुड (ता.कागल, जि.कोल्हापूर) येथील ग्रामीण रुग्णालयाचा विस्तार करुन सदरहू रुग्णालयाची श्रेणीवाढ करुन ते ५० खाटांचे करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे २ वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यात काय आढळून आले आहे व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२८-०८-२०१८) :** (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारित आरोग्य संस्थांचे श्रेणीवर्धन करण्यासंबंधी जोडबृहत आराखडा तयार करण्यात येत असून, सदर संस्थेचे श्रेणीवर्धन करण्याची मागणी, निकषानुसार जोडबृहत आराखडयामध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औराद शहाजानी (जि.लातूर) येथील ग्रामीण रुग्णालयाचे काम अपूर्ण असल्याबाबत**

**(२६) ९६६५५ (२७-१२-२०१७). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औराद शहाजानी (जि. लातूर) येथील ग्रामीण रुग्णालयाचे सन २०१४ मध्ये उद्घाटन होऊन तीन वर्षे पूर्ण झाली परंतु निधी नसल्यामुळे अद्यापही रुग्णालयाचे काम पूर्ण झाले नसल्याचे माहे जुलै २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय

(२) असल्यास, संबंधित रुग्णालय सुरू नसल्याने ग्रामीण भागातील नागरिकांची गैरसोय होत असल्याचे तेथील रुग्णांना निलंगा, लातूर याठिकाणी पाठवावे लागते हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, संबंधित रुग्णालयाला निधी उपलब्ध करुन इमारत पूर्ण होण्यासाठी राज्य शासनाने कोणते कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२८-०८-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

सन २०१४ मध्ये सदर औराद शहाजानी, ता.निलंगा, जि.लातूर येथे ग्रामीण रुग्णालयाचे भूमिपूजन होऊन कामास सुरुवात करण्यात आली.

(२) हे खरे नाही.

औराद शहाजानी येथे प्राथमिक आरोग्य केंद्र, कार्यान्वित असल्यामुळे रुग्णांची गैरसोय होत नाही. अत्यावश्यक रुग्णांनाच निलंगा, लातूर येथे पाठविण्यात येत आहे.

(३) सदर ग्रामीण रुग्णालयाचे टप्पा-१ चे काम अंतिम टप्प्यात असून सन २०१७-१८ पर्यंत एकूण रु.४९४.९७ लक्ष निधी देण्यात आला आहे. टप्पा-२ च्या कामामध्ये १० खाटांचे अतिरिक्त कक्ष, संरक्षण भिंत, पेवर ब्लॉक, पाण्याची टाकी इत्यादी कामे हाती घेण्यासाठी अंदाजपत्रक व नकाशे तयार करण्याची कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागेशवाडी (ता.औंढा नागनाथ, जि.हिंगोली) येथील आरोग्य उपकेंद्रातील आरोग्य अधिकारी व कर्मचारी मुख्यालयी रहात नसल्याबाबत**

**(२७) ९६८३० (२७-१२-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागेशवाडी (ता.औंढा नागनाथ, जि.हिंगोली) येथील आरोग्य उपकेंद्रातील आरोग्य अधिकारी व कर्मचारी मुख्यालयी रहात नसल्याने या उपकेंद्राचा कारभार आशा वर्कर चालवित असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे रुग्णांची विशेषत: गर्भवती महिलांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन संबधितावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (३०-०८-२०१८) :** (१) हे खरे नाही.
कार्यरत कर्मचारी मुख्यालयी राहत असून उपकेंद्राचे काम नियमित सुरु आहे.
(२) हे खरे नाही.
उपकेंद्र नागेशवाडी, ता.औंढा येथील नियमित आरोग्य सेवाक (महिला) तसेच कंत्राटी आरोग्य सेविका हया कार्यरत आहेत. त्यामुळे गर्भवती महिलांची गैरसोय होत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**फाळेगाव (ता.जि. हिंगोली) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांची झालेली दुरवस्था**

**(२८) ९७२८१ (२७-१२-२०१७). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फाळेगाव (ता.जि.हिंगोली) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांची इमारतीची दुरवस्था झाली आहे तसेच तेथील कर्मचाऱ्याचे निवासस्थानाची इमारतीचे प्लास्टर उखडले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, उक्त आरोग्य केंद्रांतर्गत परिसरातील २९ गावांचा समावेश असून मात्र इमारत मोडकळीस आल्यामुळे रुग्णांना इजा होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, औषधोपचाराअभावी रुग्णांची गैरसोय होत असून याकडे संबंधित विभागाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार कोणती उपाययोजना करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२८-०८-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) हे खरे नाही.

प्राथमिक आरोग्य केंद्राच्या मागणीनुसार जिल्हा स्तरावरुन औषधी पुरवठा करण्यात आलेला असून आवश्यकतेप्रमाणे मानव विकास योजना व रुग्ण कल्याण समिती निधीमधून स्थानिक स्तरावर औषधी खरेदी करण्यात येऊन रुग्णांना देण्यात येते.

(४) सदर प्राथमिक आरोग्य केंद्राच्या पुनर्बांधणीसाठी राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत सन २०१८-१९ च्या पीआयपीमध्ये आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याबाबत केंद्र शासनास विनंती करण्यात आली आहे. सदर प्राथमिक आरोग्य केंद्रात जानेवारी २०१७ ते डिसेंबर, २०१८ या कालावधीत ७०- प्रसूती व १३४-कुटूंब कल्याण शस्त्रक्रिया करण्यात आल्या असून, ८३०७ बाह्यरुग्ण, ४०५ आंतररुग्ण यांना उपचारात्मक सुविधा पुरविण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे एकुरगा (ता.जि.लातूर) येथे उपकेंद्राऐवजी प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करण्याबाबत

**(२९) ९७३२० (२७-१२-२०१७). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे एकुरगा (ता.जि.लातूर) येथे प्राथमिक आरोग्य उपकेंद्र असून सदर गाव व परिसरातील नागरिकांनी वैद्यकीय सुविधेसाठी उपकेंद्राऐवजी प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करण्याबाबत मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, लातूर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर प्राथमिक केंद्र मंजुरीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२८-०८-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारित नवीन आरोग्य संस्थांचे स्थान निश्चित करण्यासाठी जोड बृहत आराखडा तयार करण्यात येत असून सदर ठिकाणची मागणी निकषानुसार जोडबृहत आराखडयामध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर व सोलापूर जिल्हयातील शेतकऱ्यांचे खाजगी क्षेत्र माळढोक अभयारण्यासाठी राखीव ठेवण्याचा निर्णय**

**(३०) ९७७४८ (२६-१२-२०१७). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर व सोलापूर जिल्हयातील शेतकऱ्यांचे खाजगी क्षेत्र गायरान जमिन, आणि राखीव वन क्षेत्र मिळून एकूण ३६ हजार ६७३ हेक्टर क्षेत्र माळढोक अभयारण्यासाठी राखीव ठेवण्याचे शासनाने दिनांक ५ मार्च, २०१६ रोजी अधिसुचित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांचे खाजगी क्षेत्र अधिसूचित करण्यास शेतकऱ्यांचा विरोध आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास याबाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नूसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०३-०८-२०१८) :** (१) हे खरे आहे.

अहमदनगर व सोलापूर जिल्हयातील ३१४७७.४५ हेक्टर राखीव वनक्षेत्र, ४७१५.२२ हेक्टर गायरान / शासकिय क्षेत्र, व ४८०.२९ हेक्टर संपादित खाजगी क्षेत्र असे एकूण ३६६७२.९६ हेक्टर क्षेत्र माळढोक पक्षी अभयारण्याकरीत अधिसूचीत करण्यात आले आहे.

(२), (३) व (४) माळढोक पक्षी अभयारण्यातील अधिसूचीत करण्यात आलेल्या खाजगी क्षेत्राकरीता वन्यजीव (संरक्षण) १९७२ च्या अधिनियमातील कलम १९ ते २५ अन्वये संबधित उपविभागीय अधिकारी यांच्या मार्फत त्या क्षेत्रातील लोकांचे हक्क व सवलती बाबतची चौकशी करण्यात आली असून संबंधीतांना रु.१७.८६ कोटी इतका मोबदला अदा करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्हयातील शासकीय रुग्णालयात व प्राथमिक आरोग्य केद्रांत रुग्णांची होत असलेली गैरसोय**

**(३१) ९८१८३ (२७-१२-२०१७). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील शासकीय रुग्णालयात व प्राथमिक आरोग्य केद्रांत कर्मचाऱ्यांची रिक्त पदे, औषधांचा तुटवडा, घाणीचे साम्राज्य तसेच रुग्णालयातील उपकरणे विनावापर पडून असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे जिल्हयातील गरजू रुग्णांना खाजगी रुग्णालयात उपचार घ्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (३०-०८-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लोढोली (जि.चंद्रपूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य सेविकांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(३२) ९८५२४ (२७-१२-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोढोली (जि.चंद्रपूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य सेविकांची पदे रिक्त असल्याचे नुकतेच माहे ऑक्टोंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पदे रिक्त राहण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरहू पदे तात्काळ भरणेबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (३०-०८-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) चंद्रपूर जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्र लोंढोली व त्याअंतर्गत उपकेंद्रामध्ये आरोग्य सेविका (महिला) यांची ५ पदे मंजूर आहेत. त्यापैकी ४ पदे भरली असून १ पद स्वेच्छानिवृत्तीमुळे रिक्त आहे. तसेच भरलेल्या ४ पदांपैकी १ पद बदलीने भरण्यात आले परंतु

पेसा क्षेत्रातून कार्यमुक्त न केल्याने सदर पदावर कर्मचारी रुजू झाला नाही. त्यामुळे रिक्त आहे.
(३) सदर रिक्त पदे भरण्याबाबत ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या सुचनेनुसार रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तोपर्यंत पर्यायी व्यवस्था करुन आरोग्य सेवा पुरविण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आष्टी (जि.बीड) येथे उप जिल्हा रुग्णालय उभारण्याबाबत**

**(३३) १००५९२ (०३-०१-२०१८). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आष्टी (जि.बीड) येथे उप जिल्हा रुग्णालय उभारण्यात यावे, अशी मागणी लोकप्रतिनिधी यांच्याकडून सातत्याने शासनाकडे केली जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने आष्टी येथे उप जिल्हा रुग्णालय उभारण्याबाबत शासनाकडून धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, सदरहु निर्णयाची अंमलबजावणी किती कालावधीत होणे अपेक्षित आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२८-०८-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारित आरोग्य संस्थांचे श्रेणीवर्धन करण्यासंबंधी जोडबृहत आराखडा तयार करण्यात येत असून, सदर संस्थेचे श्रेणीवर्धन करण्याची मागणी, निकषानुसार जोडबृहत आराखडयामध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**भंडारा जिल्ह्यातील जंगल व्याप्त भागातच शेतकऱ्यांच्या पिकांचे वन्यप्राण्यांनी नुकसान केल्याबाबत**

**(३४) १०१३४३ (२६-१२-२०१७). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्ह्यातील जंगल व्याप्त भागातच शेतकऱ्यांच्या जमिनी आहेत शेतकऱ्यांनी खरीप हंगामात धानापिकांसोबतच तूर, सोयाबीन, मिरची अन्य पिकांची लागवड केली आहे या पिकांचे रानडुकरांचे कळप व हरिणीचे कळप नुकसान करीत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकरी व हिस्त्र श्वापदे यांच्यातील संघर्ष टाळण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत
(३) असल्यास, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०३-०८-२०१८) :** (१) भंडारा जिल्ह्यामध्ये वन्यप्राण्यांकडून शेतपिकांचे नुकसान झाल्याचे सन २०१४-१५ ते सन २०१७-१८ (माहे नोव्हेंबर, २०१७ अखेर) ६१९७ प्रकरणे प्राप्त झाली असून प्रस्तुत प्रकरणी प्रचलित शासन निर्णयान्वये संबंधित शेतकऱ्यांना रु. ४,०८,७५,४९८/ इतकी नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.

(२) मानव - वन्यप्राणी संघर्ष टाळण्याच्या दृष्टीकोनातून खालीलप्रामणे उपाययोजना करण्यात येतात.

- वन्यप्राण्यांना वनक्षेत्रात पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे याकरीता खोदतळे, वनतलाव करण्यात आले आहेत.
- वनालगतच्या शेतांना काही ठिकाणी सोलर कुंपण लावण्यात आलेले आहेत.
- मानव-वन्यप्राणी संघर्ष टाळण्याकरीता जलद बचाव गट (Rapid Rescue Team) ची स्थापना करण्यात आली असून त्यामधील कर्मचाऱ्यांना मानव-वन्यप्राणी संघर्ष टाळण्याच्या अनुषंगाने प्रशिक्षण देण्यात आले आहे.
- वनकर्मचाऱ्यांमार्फत वनक्षेत्रात व वन क्षेत्रालगत नियमितपणे गस्त करण्यात येते.
- वन्याप्राण्यांमुळे मनुष्य हानी / जखमी, पशुधन हानी / जखमी व शेतपिकांचे नुकसान झाल्यास प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीनुसार संबंधितास तात्काळ नुकसान भरपाई अदा करण्यात येते.

(३) वन्याप्राण्यांमुळे शेतपिकांचे नुकसान झालेल्या प्रकरणांमध्ये प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीनुसार संबंधितास तात्काळ नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे आंबाबाखा (ता.संग्रामपुर, जि.बुलढाणा) व्याघ्र प्रकल्पातील स्थलातंरीत कुटूंबियांचे पुनर्वसनासाठी देय असलेली रक्कम प्रलंबित असल्याबाबत**

**(३५) १०२०५० (२६-१२-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे आंबाबाखा (ता.संग्रामपुर, जि.बुलढाणा) व्याघ्र प्रकल्पातील स्थलातंरीत २८ पात्र कुटूंबाना दिनांक १२ ऑक्टोबर २०११ च्या पात्र कुटूंबाच्या यादीत नाव असतांना व कायम वास्तव्यास असतांना पुनर्वसनासाठी देय असलेली रक्कम न मिळाल्याने स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या निवेदनानुसार जिल्हा पुनर्वसन अधिकारी, बुलडाणा यांनी दिनांक ६ नोव्हेंबर, २०१७ च्या पत्रानुसार उप वन संरक्षक, प्रादेशिक तथा सदस्य सचिव, मेळघाट व्याघ्र प्रकल्प अकोट, वन्यजीव विभाग अकोट, जिल्हा अकोला यांना पुनर्वसनाची देय रक्कम देण्याची कार्यवाही करण्यासंदर्भात कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उप संरक्षक, प्रादेशिक, अकोट जिल्हा अकोला यांच्याकडून पुनवर्सनाची देय असलेली रक्कम देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(३) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०३-०८-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील अंबाबरवा या गावातील पुनर्वसनासाठी पात्र असलेल्या कुटुंबांची यादी जिल्हास्तरीय समिती बुलढाणा यांचेकडून सन २०१४ मध्ये मंजूर करण्यात आली आहे. त्यामध्ये कुटुंब प्रमुख संख्या २२९ व १८ वर्षावरील संख्या ६९ असे २९८ व्यक्ती पात्र आहेत. सदर यादीमध्ये उपरोक्त २८ कुटुंबाचे उल्लेख नाही.

तथापि, उपरोक्त प्रकरणातील तक्रारीच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, राजस्व, जळगावजामोद, जि. बुलढाणा यांचे स्तरावर सुरु असून चौकशी अहवाल प्रप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## परभणी जिल्हा सामान्य रुग्णालयात जैविक औषधी व रक्त पिशव्यांचा तुटवडा निर्माण झाल्याबाबत

**(३६) १०२२२६ (०३-०१-२०१८). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हा सामान्य रुग्णालयात जैविक औषधी व रक्त पिशव्यांचा तुटवडा निर्माण झाला असून त्याकडे रुग्णालय प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णालयात येणा-या ग्रामीण भागातील हजारो रुग्णांना औषधांचा तुटवडा भासत असल्यामुळे रुग्णांना बाहेरुन औषध खरेदी करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आवश्यक असलेला औषधांचा व रक्तांचा नियमित पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२८-०८-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) जिल्हा रुग्णालय, परभणी येथे रुग्णालयास अत्यावश्यक असलेली औषधे व साहित्य सामुग्री पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत. सदर रुग्णालयास, प्रतिमाह साधारणपणे ६०० ते ७०० रक्त पिशव्यांची आवश्यकता असते. माहे नोव्हेंबर २०१७ मध्ये १५ रक्तदान शिबीराव्दारे ८३८ रक्त पिशव्याच्या संकलनासह एकूण १०४६ रक्तपिशव्यांचा साठा उपलब्ध होता. त्यापैकी ६५२ पिशव्या रक्त रुग्णांना वितरीत करण्यात आल्या. माहे डिसेंबर २०१७ मध्ये १५ शिबीरे आयोजित करुन ७७० रक्त पिशव्यांच्या संकलनासह ८२२ रक्तपिशव्यांचा साठा उपलब्ध होता. त्यापैकी ६६९ रुग्णांना रक्तपिशव्यांचे वितरण करण्यात आले.

---

## राज्यात रोड अपघात विमा योजना राबविण्यात येणार असल्याबाबत

**(३७) १०४८५१ (०५-०४-२०१८). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनामार्फत रोड अपघात विमा योजना राबविण्यात येणार असल्याचे माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरच्या योजनेअंतर्गत किती रक्कमे पर्यंतचा खर्च अपघातग्रस्तास मिळणार आहे,
(३) असल्यास, सदर योजनेची अंमलबजावणी कशाप्रकारे करण्यात येणार आहे,
(४) असल्यास, सदर योजना कधीपासून सुरू करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची काय कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (३०-०८-२०१८) :** (१), (२) व (३) स्व.बाळासाहेब ठाकरे रस्ते अपघात विमा योजनेस दिनांक ७ जून,२०१६ च्या मंत्रीमंडळ बैठकीमध्ये तत्वत: मान्यता देण्यात आली आहे.
(४) प्रकरणी पुढील कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत आरोग्य मित्र रुग्णांकडून जादा रक्कम मागितल्याबाबत**

**(३८) १०५१७० (०७-०४-२०१८). श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत नेमलेल्या दोन आरोग्य मित्रांनी रुग्णांना शासकीय आरोग्य योजनांचा लाभ खाजगी रुग्णालयामार्फत मिळण्याकरिता रुग्णांकडून जादा रक्कम मागितल्या प्रकरणी लाचलुचपत खात्याने अटक केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तक्रारकर्त्याच्या आईला तक्रारकर्त्याने नागपुरातील एका खाजगी रुग्णालयात भरती केले होते जिथे हृदय रोगाची शस्त्रक्रियेचा खर्च जास्त असल्यामूळे शासकीय योजनेचा लाभ केवळ नागपूर येथील शुअरटेक रुग्णालयातच उपलब्ध असल्याचे भासवून या दोन आरोग्यमित्रांनी रुग्णाला शुअरटेक खाजगी रुग्णालयात भरती करविले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासकीय योजनेचा लाभ मिळण्याकरिता सदर दोनही आरोग्य मित्रांनी तक्रारकर्त्याकडून अग्रिम रक्कम घेतली व उर्वरित रक्कम शस्त्रक्रिये नंतर मागत असताना लाच लुचपत खात्याने या दोघांना अटक केली, हे हि खरे आहे काय,
(४) असल्यास, आरोग्य मित्रांनी केवळ शुअरटेक रुग्णालयाचे नाव जाणूनबुजून सांगितल्या प्रकरणी हृदय शस्त्रक्रिया झालेल्या खाजगी रुग्णालयावर प्रतिबंधात्मक कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (३०-०८-२०१८) :** (१) महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत नि:शुल्क उपचार असताना देखील अंगीकृत असलेल्या मेडीट्रीना रूग्णालय, नागपूर येथील

आरोग्य मित्र व इंदीरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय येथील डाटा एन्ट्री ऑपरेटर यांना १० हजार रूपयाची लाच स्विकारताना लाचलुचपत खात्याने दिनांक २६.१२.२०१७ रोजी गुन्हा दाखल करून अटक केली. सदर आरोग्य मित्र व डाटा एंन्ट्री ऑपरेटर शासकीय किंवा सोसायटीचे कर्मचारी नसून यांच्या नियुक्त्या TPA -Third Party Administrator कडून करण्यात येतात.

(२) तक्रारदार यांच्या आई यांचेवर Angiography करण्यासाठी मेडीट्रीना रूग्णालय, नागपूर येथे दाखल करण्यात आले. तेथे हृदय रोगाच्या शस्त्रक्रियेचा खर्च जास्त असल्याने तेथील आरोग्यमित्राने रूग्णास योजनेंतर्गत अंगीकृत असलेल्या शुगरटेक या खासगी रूग्णालयामध्ये शस्त्रक्रिया करण्याकरिता संदर्भीत केले. व सदर रूग्णालयात रूग्णांवर योजनेंतर्गत मोफत शस्त्रक्रिया करण्यात आली आहे.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) सदर प्रकरणी विमा कंपनीच्या विभागीय व्यवस्थापक यांनी चौकशी केलेली असून सदर लाचखोरीच्या प्रकरणाशी संबधित शुगरटेक रूग्णालयाचा प्रत्यक्ष सहभाग नसल्याचे विमा कंपनीस आढळून आले आहे. तसेच दिनांक १.०२.२०१८ पासून पॅरामाऊन्ट टिपीए ऐवजी एम डी इंडीया टिपीएकडे सदर जिल्हयातील काम सुर्पूत करण्यात आले आहे.

---

## औरंगाबाद जिल्हयातील शासकीय जिल्हा महिला व बाल रुग्णालयाला जागा उपलब्ध करून देण्याबाबत

**(३९) १०६०३३ (०७-०४-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयातील शासकीय जिल्हा महिला व बाल रुग्णालयाला मान्यता मिळून ४ वर्षाचा कालावधीनंतरही सदरचे रुग्णालय बांधण्यासाठी जिल्हाधिकारी, कृषी विभाग, सहकार विभाग, महानगरपालिका, सिडको, दुग्ध विकास व वक्फ बोर्ड यांच्याकडे वारंवार मागणी करुनही जागा अद्याप उपलब्ध झाली नाही, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदरच्या रुग्णालयाचा जागा उपलब्ध करुन देण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२८-०८-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी शासकीय दुध डेअरी, औरंगाबाद येथे न.भु.क्र. १३७८९ मधील १३८९७ चौ.मी. जागा उपलब्ध करुन देण्याचे तत्वत: मान्य केले असुन, सदर जागा जिल्हा शल्य चिकित्सक, औरंगाबाद यांच्या नावे हस्तांतरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**नागपूर रेल्वेस्टेशन पार्सल विभागामध्ये अवैध्यरित्या आणलेले कासव मिळाल्याबाबत.**

**(४०) १०६२०२ (३१-०३-२०१८). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर रेल्वेस्टेशन पार्सल विभागामध्ये दिड महिन्यापुर्वी मोठ्या प्रमाणात स्टार कासव नागपूर शहरामध्ये विक्री करण्याकरीता अवैधरित्या आणण्यात आले असल्याची बाब माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कासवांना अद्यापपर्यंत सुरक्षीत स्थळी स्थलांतरीत केले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कासवांपैकी काही कासवे गहाळ झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वन विभागाने कासवांना नैसर्गिक स्थळी सोडण्यासाठी व दोषी व्यक्तींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०३-०८-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) दिनांक १४.११.२०१७ रोजी गुप्त माहितीच्या आधारे श्री. क्रिष्णा मंगलजी दुधपाचारे, रा. गजानन नगर, भांडेवाडी, नागपूर यांच्या घराची वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी झडती घेतली असता, ३ जिवंत कासव आढळून आले. सदर प्रकरणी आरोपींविरुध्द वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ च्या तरतुदीनुसार वन गुन्हा नोंदविण्यात आला आहे. तसेच सदर ३ जिवंत कासवांना उपचाराकरिता वनविभागाच्या उपचार व निवारा केंद्रामध्ये दाखल करुन उपचारानंतर गोरेवाडा तलाव येथे निसर्गमुक्त करण्यात आले.

दिनांक १४.११.२०१७ रोजी गुप्त माहितीच्या आधारे वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी नागपूर रेल्वे स्टेशन मधील पार्सल विभागामध्ये झडती घेतली असता, एका पार्सलमध्ये ६ जिवंत कासव (Indian Star Turtle) आढळून आले. सदर प्रकरणी आरोपींविरुध्द वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ च्या तरतुदीनुसार वन गुन्हा नोंदविण्यात आला आहे. तसेच सदर ६ जिवंत कासवांना उपचाराकरिता वनविभागाच्या उपचार व निवारा केंद्रामध्ये दाखल करण्यात आले व उपचारानंतर नवेगावबांध, तालुका अर्जुनी मुरगाव, जि. गोंदिया येथे निसर्गमुक्त करण्यात आले.

दिनांक ०५.०१.२०१८ रोजी गुप्त माहितीच्या आधारे वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी पंकज ॲक्वेरीयम, नागपूर येथे झडती घेतली असता, ४ जिवंत कासव आढळून आले. सदर प्रकरणी आरोपींविरुध्द वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ च्या तरतुदीनुसार वन गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर ४ जिवंत कासवांना उपचाराकरिता वनविभागाच्या उपचार व निवारा केंद्रामध्ये दाखल करण्यात आले. तथापि, उपचारादरम्यान सदर ४ कासवांचा मृत्यु झालेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देवनगर (ता.दिग्रस, जि.यवतमाळ) येथील वनविभागाच्या प्रतिबंधीत क्षेत्रात बेकायदेशीर खोदकाम सुरू असल्याबाबत**

**(४१) १०६४५२ (३१-०३-२०१८). श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवनगर (ता.दिग्रस, जि.यवतमाळ) येथील वन विभागाच्या प्रतिबंधीत क्षेत्रात ओम बहिरम मजुर सोसायटीच्या तीन मशीन लावून बेकायदेशीर खोदकाम सुरू असताना सुद्धा त्यावर पांढरकवडा उप-वनसंरक्षक कोणतीही कारवाई करीत नसल्याचे सन २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, या सर्व मशिनी वन विभागाने जप्त कराव्या अशी मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, त्यानुसार संबंधीत सोसायटीवर कोणती कारवाई केली वा करण्यात य्त आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०३-०८-२०१८) :** (१) व (२) यवतमाळ वन वृत्तांतर्गत पुसद वन विभागातील दिग्रस वन परिक्षेत्रातील (दिग्रस तालुक्यातील) देवनगर येथील वन जमिनीवर ओम बहिराम मजूर सोसायटीने काम केलेले नाही अथवा अशी घटना सन २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निर्दशनास आली नाही. तसेच देवनगर येथील वन विभागाचे प्रतिबंधीत क्षेत्र पुसद वन विभागाचे कार्यक्षेत्रात येत असल्याने, उप वनसंरक्षक, पांढरकवडा यांनी कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मेरा बु. (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथील अंत्रीखेडेकर प्राथमिक आरोग्य केंद्रात महिलांची गैरसोय होत असल्याबाबत**

**(४२) १०६४७६ (०७-०४-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेरा बु. (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथील अंत्रीखेडेकर प्राथमिक आरोग्य केंद्रात कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया झालेल्या महिलांची सुविधेअभावी गैरसोय होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत संबधित अधिका-यांकडे तक्रार करुनही त्यांनी कोणतीच कार्यवाही केली नाही, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, या आरोग्य केंद्रात तातडीने कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया झालेल्या महिलांना आवश्यक त्या सुविधा पुरविण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नसल्याने प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया तातडीने न करता दर गुरुवारी नियमितपणे करण्यात येतात.
या शस्त्रक्रिया तज्ञ, अनुभवी, प्रशिक्षीत वैदयकिय अधिकारी करतात.
या प्राथमिक आरोग्य केंद्रात सुसज्ज शस्त्रक्रिया गृह असून निवास कक्षाची क्षमता (वार्ड) १४ खाटांची आहे. निवासासाठी अत्यावश्यक (पाणी, स्वच्छतागृह, खाटा इत्यादी) असणाऱ्या सर्व सुविधा उपलब्ध आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## मुंबई राज्य कामगार विमा योजना रूग्णालयाच्या निवासी वसाहतीच्या इमारतीची झालेली दुरवस्था

**(४३) १०८३३१ (१४-०४-२०१८). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई राज्य कामगार विमा योजना रुग्णालयाच्या निवासी वसाहतीच्या इमारतीची दुरवस्थेकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी राज्यस्तरीय शासकीय महिला कर्मचारी व शासकीय कुटुंब महिला मंचच्या वतीने दिनांक १० जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास उपोषण करण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य कामगार विमा योजनेच्या वसाहतीची अत्यंत दुरवस्था झाल्याने कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांच्या जीवीतास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१३-०८-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.
राज्यस्तरीय शासकीय महिला कर्मचारी व शासकीय कुटुंब महिला मंच यांनी उपोषण करण्याबाबतचे निवेदन सादर केले होते. तथापि, राज्य कामगार रुग्णालय ठाणे येथील प्रलंबित

कामे करुन घेण्यासाठी निविदेमार्फत दिनांक ०६.०१.२०१८ अन्वये एका संस्थेची नियुक्ती करण्यात आली असल्याची बाब सदर संघटनेच्या निदर्शनास आणून दिल्याने उपोषण वेळेवर मागे घेण्यात आले होते.

(२) हे अंशत: खरे आहे.

राज्य कामगार विमा योजना रुग्णालय, ठाणे येथील दुरावस्था झालेल्या निवासी इमारतीमधील कर्मचाऱ्यांना पर्यायी निवासस्थान उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

(३) राज्य कामगार विमा योजना रुग्णालय, ठाणे येथील इमारत राज्य कामगार विमा महामंडळ, नवी दिल्ली यांच्या मालकीची असून निवासी इमारतींच्या वार्षिक दुरुस्ती व देखभालची कामे काही प्रमाणात पुर्ण करण्यात आली आहेत. तसेच, विशेष दुरुस्ती व काही दुरावस्था झालेल्या इमारती Demolition च्या कामाच्या अंदाजपत्रकास राज्य कामगार विमा महामंडळ, नवी दिल्ली यांनी मान्यता दिली आहे व त्यानुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजा ढीवरवाडा (ता.मोहाडी, जि.भंडारा) येथे वन्यप्राणी व मानव त्यांच्यातील संघर्ष रोखण्याच्या कार्यवाहीस विलंब होत असल्याबाबत**

**(४४) १०९१९४ (३१-०३-२०१८). श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा ढीवरवाडा (ता.मोहाडी, जि.भंडारा) येथे वन्यप्राणी व मानव यांच्यातील संघर्ष रोखण्याच्या कार्यवाहीस विलंब होत असल्याचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.वनेमंत्री यांना दिनांक २९ जुलै,२०१७ रोजी वा त्यासुमारास दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०३-०८-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) मौजा ढिवरवाडा ता.मोहाडी, जि.भंडारा परिसरात मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्याच्या हेतूने वनालगतच्या क्षेत्रात तारेचे कुंपण उभारण्याकरिता नाविण्यपूर्ण योजनेअंतर्गत निधी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भंडारा यांना उपलब्ध करुन देण्यात आला आहे. ई-निविदा प्रक्रियेद्वारे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तारेचे कुंपण उभारण्याची कामे करण्यात येतील.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील खाजगी रुग्णालयांत गरीब रुग्णांकडून अवास्तव बिल आकारणी करीत असल्यबाबत**

**(४५) १०९२१७ (३१-०३-२०१८). श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी रुग्णालयांकडून अवास्तव बिल आकारणी होत असून गोरगरीब रुग्णांची फसवणूक होत असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली असल्याने खजगी रुग्णालयाच्या कारभारावर कायदेशीर अंकुश आणण्यासाठी परिणामकारक उपाययोजना करण्याचे विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत निर्णय घेण्यात आला आहे काय, असल्यास, निर्णयाचे स्वरुप काय आहे व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) अद्याप, निर्णय घेण्यात आला नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत व यासंदर्भात सद्यस्थिती काय आहे ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) वैद्यकीय आस्थापना विधेयक-२०१४ चा मसुदा सार्वजनिक आरोग्य विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला असून सदर विधेयक राज्यात लागु करण्यापूर्वी विधेयकातील तरतूदींवर संबंधित क्षेत्रातील व्यक्ती वा संस्थांचे स्पष्ट अभिप्राय जाणून घेण्यासाठी उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जांभळा (ता.हदगांव, जि.नांदेड) येथील मग्रारोहयो अंतर्गत रोपवाटिकेच्या जमिनीचे भाडे प्रलंबित असल्याबाबत**

**(४६) ११०२०५ (२८-०३-२०१८). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जांभळा (ता.हदगांव, जि.नांदेड) येथील मग्रारोहयो अंतर्गत रेपवाटिकेच्या जमिनीचे भाडे गेल्या सहा महिन्यांपासून वन विभागाकडून देण्यात आले नसल्याचे नुकतेच माहे जानेवारी,२०१८ मध्ये वा त्यादरम्यान आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भाडे देत नसेल तर एकही रोप उचलू न देण्याचा निर्धार शेतमालकाने केला असल्याने दीड लाख रोप नष्ट होण्याच्या अवस्थेत आहेत,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, तदनुसार यास जबाबदार असणा-यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२८-०८-२०१८) :** (१) हे खरे नाही.

हदगांव तालुक्यातील जिल्हा नांदेड मधील मौजे जांभळा येथील मालकी गट क्रमांक १५३ क्षेत्रांपैकी१० गुंठे जमीन संबंधित शेतकरी यांच्याकडून माहे नोव्हेंबर, २०१६ पासून ११ महिन्यांसाठी करारनामा करुन मग्रारोहयो अंतर्गत रोपवाटीकेसाठी भाडे तत्वावर घेण्यात आली होती. या भाडयापोटी दि. १५.०४.२०१७ रोजी रु. ५४,९००/- व दिनांक ३०.०६.२०१७ रोजी रु. ५४,९००/- असे एकूण रु.१,०९,८००/- इतकी रक्कम धनादेशाद्वारे संबंधित शेतकऱ्यांस अदा करण्यात आली आहे.

(२) संबंधित शेतकरी यांच्या जमिनीवर असलेल्या रोपवाटीकेतील रोपे दि.११.०१.२०१८ व दि.१२.०१.२०१८ या दोन दिवसात अन्य रोपवाटीकेत स्थलांतरीत केली आहेत. त्यामुळे दीड लाख रोपे नष्ट होण्याचा प्रश्न उदभवत नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हिंगोली जिल्हा सामान्य रूग्णालयाच्या दुरवस्थेबाबत**

**(४७) ११०५८६ (३१-०३-२०१८). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हा सामान्य रूग्णालयाच्या इमारतीचे बांधकाम अपूर्णावस्थेत असून तसेच डॉक्टरही रुग्णालयात वेळेवर उपस्थित न राहिल्यामुळे रुग्णांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू जिल्हा सामान्य रूग्णालयाच्या दयनीय अवस्थेबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार रूग्णालयाचा कारभार सुरळीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२८-०८-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) हिंगोली येथील जिल्हा सामान्य. रुग्णालयास २०० खाटा मंजूर असून सद्यस्थितीत १०० खाटांचे रुग्णालय कार्यान्वित आहे. वाढीव १०० खाटांच्या बांधकामासाठी रु.१०७१.७० लक्षच्या अंदाजपत्रकास मंजूरी देण्यात आली असून बांधकाम सुरु करण्यात आले आहे. बांधकामासाठी मार्च, २०१७ पर्यंत रु.५५२.५३ लक्ष, सन २०१७-१८ मध्ये रु.१००.०० लक्ष व सन २०१८-१९ मध्ये १२५.०० लक्ष इतका निधी आतापर्यंत वितरीत करण्यात आला आहे. रुग्णालयाचे बांधकाम पुर्ण करण्याकरीता प्रथम दि.१२.१२.२०१३ अशी मुदत होती. सदर मुदत दि.१.११.२०१५ पर्यंत वाढवून देण्यात आली होती. तरीही बांधकाम पूर्ण न झाल्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दि.१.११.२०१५ पासून संबंधित कंत्राटदारास रु.३००/- प्रतिदिन दंड आकारण्यात आला आहे. सद्यस्थितीत इमारतीचे बांधकाम, अंतर्गत विद्युतीकरण व

रंगरंगोटीचे काम पूर्ण झाले असून, बाहेरील रंगाचे व ॲल्युमिनियम कंम्पोजीट पॅनलचे काम सुरु असून, कामे प्रगतीपथावर आहेत. त्याचप्रमाणे डॉक्टरांना रुग्णालयात वेळेवर उपस्थित राहण्याबाबत जिल्हा शल्य चिकित्सक, हिंगोली यांनी लेखी सूचना दिल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वडणगे (ता.करवीर,जि.कोल्हापूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील रुग्णांचे आरोग्य धोक्यात असलेबाबत**

**(४८) १११७४४ (०५-०४-२०१८). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडणगे (ता.करवीर, जि.कोल्हापूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या बाजूला असणाऱ्या गल्लीतून वाहणारे मैलामिश्रीत सांडपाणी, कचरा आणि आजूबाजूला वाढलेली झुडपे यामूळे या आरोग्य केंद्रातील रुग्णांचे आरोग्य धोक्यात आल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आरोग्य केंद्राची दुरवस्था दूर करण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२८-०६-२०१८)** : (१) हे खरे आहे.
(२) ग्रामपंचायत वडगणे यांना सांडपाणी वाहून नेणारी गटारे बांधण्याबाबत विनंती करण्यात आली असून ग्रामपंचायतीकडून पुढील कार्यवाही सुरु आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

**महात्मा जोतीबा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत उपचार व रुग्णालय वाढविणेबाबत**

**(४९) ११२००० (०१-०४-२०१८). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने दिनांक १६ ऑक्टोबर २०१७ पासून महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेची शासकीय प्रक्रिया राबवण्यास सुरुवात केली असून या योजनेअंतर्गत उपचार व रुग्णालय वाढविण्याची मागणी लोकप्रतिनिधीनी दिनांक २ जानेवारी २०१८ रोजी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेमध्ये १५२ आजारावर २८० रुग्णालये वाढविले जाणार आहेत, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनेमध्ये अधिकाधिक आजार वाढविणेबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (३०-०८-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेतील उपचारांमध्ये वाढ करुन ११०० उपचार अंर्तभूत असलेली महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना राबविण्यास दिनांक ०४.०८.२०१६ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. परंतू प्रशासकीय बाबींमुळे सदर योजनेची अंमलबाजवणी होऊ शकलेली नाही.

सध्या या योजनेंतर्गत ३० निवडक विशेष सेवांतर्गत ९७१ प्रकारचे गंभीर व अधिक खर्चिक उपचार व १२१ शस्त्रक्रिया पश्चात सेवांचा (फॉलोअप) समावेश असून लाभार्थी रुग्णांना ४८४ अंगीकृत शासकीय व खाजगी रुग्णालयामधून रोख रक्कमरहित (कॅशलेस) या वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देण्यात येतात. योजनेंतर्गत वार्षिक विमा संरक्षण रक्कम प्रति वर्ष/ प्रति कुटुंब रु.१.५० लक्ष एवढया मर्यादेपर्यंत मोफत उपचार अनुज्ञेय असून मुत्रपिंड प्रत्यारोपणासाठी सदर मर्यादा रु. २.५० लक्ष एवढी आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिंधुदूर्ग जिल्ह्यात वैद्यकीय सोई-सुविधांनी परिपूर्ण रुग्णालय उभारण्याबाबत

**(५०) ११५५८३ (११-०४-२०१८). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदूर्ग जिल्ह्यात वैद्यकीय सोई-सुविधांनी परिपूर्ण असे रुग्णालय उभारण्याची मागणी अनेक वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्रातील रुग्णांना बांबोळी गोवा येथील रुग्णालयात शुल्क आकारण्याचा निर्णय गोवा सरकारने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सिंधुदूर्ग जिल्ह्यात वैद्यकीय सुविधांनी युक्त रुग्णालय उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२८-०८-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सिंधुदूर्ग जिल्ह्यात २०० खाटांचे जिल्हा रुग्णालय, ३ उपजिल्हा रुग्णालये व ७ ग्रामीण रुग्णालये कार्यान्वित आहेत. सिंधुदूर्ग जिल्ह्यातील रुग्णांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बांबोलीम, गोवा राज्य येथे स्वाईन फ्ल्यू, माकडताप (केएफडी), लेप्टोस्पायरोसिस आणि रस्ते अपघात या गंभीर आजारावर उपचार घेण्यासाठी येणाऱ्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती करण्यास दि.२८.०३.२०१८ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. तसेच सिंधुदूर्ग जिल्ह्यात सुपर स्पेशालिटी रुग्णालय सुरु करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.